संपादक मोमासे बी. एन. (1)

# Economic Geography III

प्र. आर्थिक भूगोलाचे व्याख्या, स्वरूप, व्याप्ती स्पष्ट करा?

प्रस्तावना (Introduction)

→ आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची सगळी आर्थिक विकसित झालेली अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. आर्थिक भूगोल ही भूगोलाची एक स्वतंत्र शाखा असली तरी इतर शास्त्रातील विचारवंतांनी या शास्त्राच्या विकासाला कारणीभूत असे योगदान दिलेले आहे. भूगोल विषय प्राचीन काळापासून ज्ञात असला तरी सुमारे २००० वर्षांपासून भूगोलाला शास्त्राचे एक निश्चित शाखा म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे. इतर शास्त्रातील विचारवंतांनी या शास्त्राच्या विकासाला जी मदत केली त्यामध्ये भूगोलाच्या अर्थशास्त्र, समाजशास्त्र, लोकसंख्याशास्त्र इ. वेगवेगळ्या शास्त्रांचे या शास्त्राशी संबंधित आहेत. आर्थिक भूगोलाच्या अभ्यास विषय प्राचीन भूगोलतज्ञांनी अप्रत्यक्षपणे अभ्यासला नाही. पाश्चिमात्य काळात मात्र या विषयाच्या अभ्यासाला शास्त्रशुद्ध सुरुवात झाली आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या काळात आर्थिक भूगोलाचा अभ्यास विषय वाढ झाला. प्रत्येक पृथ्वीवरील संसाधनांशी संबंधित असलेल्या घटकांची माहिती मानवाला जशी जशी होत गेली तसतशी भूगोल विषयात भर पडत गेली.

आर्थिक भूगोलात मानवाच्या आर्थिक व्यवसायाचा अभ्यास केला जातो. मानवाचे आर्थिक व्यवसाय, प्राकृतिक आणि सब सांस्कृतिक पर्यावरणावर अवलंबून असतात. पर्यावरणाच्या भिन्नतेमुळे मानवाच्या आर्थिक व्यवसायात भिन्नता आढळते.

मानवाने सर्वप्रथम आपल्या सभोवतालच्या पर्यावरणातून अन्न वस्त्र निवारा या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करत असतो परंतु भूपृष्ठावरील साधनसंपत्तीच्या असमान वितरणामुळे तो राहतो त्या प्रदेशात मानवाच्या गरजा पूर्ण न करता येऊ शकत नाही अशावेळी इतर प्रदेशातून वस्तूंची देवाण घेवाण करावी लागते. म्हणून आर्थिक भूगोलात साधनसंपत्तीचे वितरण, वस्तूंचे उत्पादन व उपभोग यांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो.

आर्थिक भूगोलाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला वास्तविक जर्मनीत झाली सुरुवातीला या शास्त्राला भू-अर्थशास्त्र (Geoeconomics) हे नाव सर्व प्रथम चीशोल्म या शास्त्रज्ञाने दिले. या शास्त्रज्ञाने या शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात केली त्याने केली म्हणून त्याला भू-अर्थशास्त्राचे जनक असे म्हणतात.

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:07

## भूगोलाच्या प्रमुख शाखा

**प्राकृतिक भूगोल**

1. खगोलीय भूगोल
2. भूरूपशास्त्र
3. हवामानविषयक भूगोल
4. सागरी भूगोल
5. जैविक भूगोल
6. मृदा भूगोल

**मानवी भूगोल**

**सामाजिक भूगोल**

1. लोकसंख्या भूगोल
2. वसाहती भूगोल
   - ग्रामीण
   - नागरी
3. राजकीय भूगोल
4. ऐतिहासिक भूगोल
5. वैद्यक भूगोल
6. पर्यटन भूगोल
7. लष्करी भूगोल

**आर्थिक भूगोल**

1. साधनसंपत्ती भूगोल
2. कृषी भूगोल
3. औद्योगिक भूगोल
4. व्यापारी भूगोल
5. विपणन भूगोल

* **आर्थिक भूगोलाच्या व्याख्या :- (Definition of Economic Geography)**

(1) चिशोल्म :- "आर्थिक भूगोल म्हणजे अर्थ आणि व्यापार यांच्याशी संबंधित असणाऱ्या भौगोलिक घटकांचा बौद्धिकदृष्ट्या केलेला तर्कशुद्ध अभ्यास होय" (Economic geography is an intellectual interest to the study of geographical facts in relation to economy and commerce. (Chishólm)

*(2) सार ई. मर्फी:

"आर्थिक भूगोल म्हणजे मानव ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणाची समानता व भिन्नता याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय"

*(3) रसेल :

"आर्थिक भूगोल म्हणजे मानवाच्या शक्य तितक्या भौगोलिक घटकांचा होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय"

(4) मॅकफिल :

"आर्थिक भूगोल म्हणजे क्रिया आंतरक्रिया व भिन्नता यांच्याशी अभ्यासला जातो। म्हणजे मानवी भूगोल म्हणजे सामाजिक अभ्यास होय"

(5) एल्सवर्थ हंटिंग्टन :

"मानवी व्यवसाय कार्यक्षमता आणि धर्म, शासन

3

इतर सांस्कृतिक घटकांचा विषय अभ्यासला व भौगोलिक पर्यावरणाच्या प्रभाव यांचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.

⑥ डॉ. किलन यांच्या मते:
"आर्थिक भूगोल म्हणजे उत्पादन, वितरण, उपभोग आणि विनिमय या चारही मानवी प्रयत्नातून व प्रादेशिक दृष्टिकोनातून केलेला अभ्यास होय."

⑦ मालेकझांदर:
"आर्थिक भूगोल म्हणजे पृथ्वीवरील उत्पादन आणि उपभोग संबंधीत मानवी कार्यांचा प्रादेशिक भिन्नतेचे अध्ययन होय".

⑧ मॅकफरलेन:
"आर्थिक भूगोल म्हणजे भौतिक परिस्थितीचा आर्थिक कार्यावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास होय".

⑨ सिमसन:
"आर्थिक भूगोल हे पर्यावरणाच्या संबंधातील मानवाच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र होय".

* आर्थिक भूगोलाचे स्वरूप: (Nauter of the Economic Geography)

① वर्णनात्मक स्वरूप:-
पूर्वीच्या काळात भूगोलाचा अभ्यास ज्या प्रमाणे वर्णनात्मक स्वरूपाचा होत असे. तसाच आर्थिक भूगोलाचा अभ्यास देखील सुरुवातीच्या काळात वर्णनात्मक स्वरूपाचा होत असे. उदा. जंगले, प्राणी, उद्योगधंदे, दळणवळण, पिके, खनिजे. इ. आर्थिक भूगोलाशी संबंधीत आहेत. या विषयाचा अभ्यास वर्णनात्मक पद्धतीने होत असे म्हणून सुरुवातीच्या काळखंडात आर्थिक भूगोलाचे स्वरूप वर्णनात्मक स्वरूपाचे होते.

② कार्यकारण भाव स्वरूप:
आर्थिक भूगोल हे शास्त्र असल्याने आर्थिक भूगोलातील निरनिराळ्या विषयाचा अभ्यास शास्त्रशुद्ध व पद्धतीने करणे आवश्यक आहे. कारण वर्णनावरून या विषयावरून निरनिराळ्या गोष्टींचे स्वरूप स्पष्ट होत नाही. यालाच या विषयातील कोणतीही गोष्ट का व कशी घडते. याचे कारण निमांसा झाली पाहिजे. उदा. मनुष्य आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी काही आर्थिक क्रिया करतो त्यालाच मानवी व्यवसाय असे म्हणतात. याला शिकार, मासेमारी पशुपालन, शेती, लाकूडकटाई, कारखानदारी ...

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:07

व्यवसायाचा समावेश होतो. या व्यवसायाद्वारे मनुष्य आपल्या गरजा भागवितो. परंतु जगात मानवाला एकाच प्रकारचा व्यवसाय करता येत नाहीत. कारण मानवाचे व्यवसाय त्या भागातील उपलब्ध साधनसंपत्तीवर आणि तेथील प्राकृतिक व आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतात. उदा. जेथे की परिस्थिती प्रतिकूल स्वरूपाची असते तेथे मानवाच्या व्यवसायाचा विकास होत नाही जेथे की परिस्थिती अनुकूल असते तेथे मानवाच्या व्यवसायाचा विकास होतो. म्हणून कोणत्याही प्रदेशातील मानवी व्यवसायाची माहिती घेत असताना तेथे असलेल्या व्यवसायास अनुकूल परिस्थिती पाहिजे. या अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीची कारण मिमांसा करावी लागते. म्हणून आर्थिक भूगोल हे सर्व विषयातील निरनिराळे शोध घेणारे शास्त्र आहे.

③ परिवर्तनशील स्वरूप :

आर्थिक भूगोलातील विषयाच्या विकासाचा आढावा घेतला जातो. त्या पूर्वीपासून आजतागायत बदल होत असलेले दिसून येतात. मानवाला आपल्या गरजा भागविण्यासाठी जे व्यवसाय करावे लागतात ते व्यवसाय प्राचीन काळापासून सुरू आहेत. परंतु सर्वच सुरुवातीच्या काळामध्ये ज्या व्यवसायाची प्रगती झाली नाही. मानवाच्या प्रगतीबरोबर त्याच्या व्यवसायाची प्रगती होत गेली तसेच त्यात बदल होत गेले.

① शिकार :

मानवाने केवळ आपली उपजीविका भागविण्यासाठी शिकार करीत असे. मध्यंतरी अमेरिका व रशिया इ. देशात व्यापारी स्वरूपाची शिकार सुरू झाली होती. आजकाल बहुतेक देशामध्ये शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे हा व्यवसाय संपुष्टात आला आहे.

② मासेमारी :

शिकारी प्रमाणेच मानवाने पूर्वी केवळ उदरनिर्वाहासाठी मासेमारी करीत होते. त्याच काळात मनुष्य केवळ जाळे, गळ इ. साधनाने मासेमारी करत होते. आता बहुतेक देशात मासेमारी व्यापारी पद्धतीने होत असून त्यासाठी विविध अत्याधुनिक साधनांचा वापर होत आहे.

③ पशुपालन :

पूर्वी मानव केवळ पशुपालन उपजीविकेकरीता पशुपालन व्यवसाय होत असे. तसेच त्या काळात मानव हा व्यवसाय

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:07

भटक्या स्वरूपाच्या करत असे. परंतु आज अनेक देशात हा व्यवसाय मासेमारी पद्धतीने होत असून तो खूपच भरभराटीस आलेला आहे. उदा. हा व्यवसाय मांस, दूध, लोकर उत्पादनासाठी करण्यात येत असून या करीता गाई, शेळ्या, मेंढ्या, डुक्कर इ. प्राणी मोठ्या प्रमाणात पाळण्यात येत आहेत. बहुतेक देशात हा व्यवसाय आधुनिक पद्धतीने होत असे.

(4) शेती:

पूर्वकालिच्या काळात मनुष्य हा शिकारी भटका होता. त्याला शेतीची कला अवगत नव्हती मनुष्य. जसजसा सुधार होत गेला तेव्हा पासून मानवाला शेतीची कला अवगत होत गेली. त्यासाठी अनुकूल भूरचना, सुपिक जमीन, पुरेसे तापमान व पर्जन्य असलेल्या प्रदेशात ही शेती केली जाते.

* आर्थिक भूगोलाची व्याप्ती :- (Scope of Economic Geography)

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची प्रमुख शाखा आहे. यात मानवाच्या आर्थिक क्रियांचा अभ्यास केला जातो. उदा. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. त्या गरजा भागविण्यासाठी मानवाला वेगवेगळे व्यवसाय करावे लागतात. उदा. शिकार, मासेमारी, पशुपालन, शेती, कारखाने, उद्योगधंदे, लाकूडतोड इ. व्यवसाय करावे लागतात. मानवाचे हे व्यवसाय निरनिराळ्या साधनसंपत्तीवर अवलंबून असतात. उदा. जमीन, खाणी, पाणी, खनिज इ. महत्वाची साधनसंपत्ती आहे. आर्थिक भूगोलात या सर्व विषयाचा अभ्यास केला जातो.

(1) शिकार :-

मानव प्राथमिक अवस्थेत असताना निरनिराळ्या प्राण्यांची शिकार केली जात असे आणि प्राण्यांवर उपजीविका भागवत असे. शिकारीचा व्यवसाय वन्य पशू पक्ष्यांवर अवलंबून होता. यात मांस, कातडी, लोकर, हाडे, शिंगे इ. पदार्थ गोळा करण्याच्या व्यवसायात मानवाचा समावेश होतो.

(2) साधनसंपत्ती :-

आर्थिक भूगोलाचे अध्ययन साधनसंपत्तीपासून सुरू होते. या साधनसंपत्तीचे नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी साधनसंपत्ती असे दोन प्रकार पडतात.

(1) नैसर्गिक साधनसंपत्ती - यात जमीन, पाणी, जंगल, प्राणी, खनिजे इ. नैसर्गिक साधनसंपत्ती होय.

(2) मानवानिर्मित साधनसंपत्ती :- इमारती, रस्ते, कालवे, जलसिंचन, विद्युत केंद्रे इ. मानवी साधनसंपत्ती होय.

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:07

नैसर्गिक साधनसंपत्तीद्वारे मानवाच्या गरजा भागवल्या जातात. त्यावर मानवाचे व्यवसाय व जीवन अवलंबून आहे. मानवी साधनसंपत्तीमध्ये साधने मानवाने स्वतःच्या उपयोगासाठी आणि आपले जीवन सुखी करण्यासाठी निर्माण केले आहे

• वाणिज्य व वनसंपत्ती :-

या शास्त्रात जगातील विविध प्रदेशातील विविध प्रकारच्या साधनसंपत्तीचा शोध आर्थिक भूगोलात घेतला जातो आहे. तेथील साधनसंपत्ती विनियोगावर तेथील प्राकृतिक घटकाचा कसा परिणाम होतो. हे या शास्त्रात स्पष्ट होते. त्याचप्रमाणे जगातील व्यापारी मार्ग, त्यांचा विकास व त्यावर परिणाम करणाऱ्या प्राकृतिक घटकांचा समावेश या शास्त्रात करावा लागतो. या साधनसंपत्तीचा वापर विविध उत्पादने घेणे व मानवाच्या आर्थिक क्रियांचा भाग आहे.

कोणता प्रदेश कोणत्या उत्पादनासाठी अनुकूल आहे. हे तेथील आर्थिक क्रिया किंवा नैसर्गिक परिस्थितीवरून ठरवता येते. आर्थिक भूगोलाने कोणता प्रदेश कोणत्या उत्पादनासाठी योग्य आहे हे ठरवायाचे आहे.

• रॉबिन्सन :- ( जिओग्राफी फॉर बिझनेस स्टडीज )

या ग्रंथात म्हटले आहे की आर्थिक भूगोलाचा संबंध भूपृष्ठावरील नैसर्गिक पर्यावरणाचा मानवाकडून होणाऱ्या विनियोगाशी आहे. वस्तूंचे उत्पादन त्यांचे वाहतूक वितरण व विनिमय यांच्याशी संबंध आहे. या घटकांचा अभ्यास आर्थिक भूगोलात केला जातो.

③ मासेमारी :-

मानव प्राथमिक अवस्थेत असताना मासेमारी हा व्यवसाय करीत होता. मासेमारी समुद्र किनाऱ्यावर त्याचे स्वरूप, हवामान, माशांचे प्रमाण, वाहतुकीच्या सोयी, बाजारपेठ इ. घटकांवर अवलंबून असते. येथे हे घटक अनुकूल असल्यास तेथे मासेमारी व्यापारी पद्धतीने केली जाते. मासेमारी बरोबरच बोटींच्या तयार करणे व दुरुस्त करणे, जाळे निर्माण करणे, मासे वाळवणे, खारवणे, ते हवाबंद डब्यात भरणे इ. संबंधित व्यवसाय महत्त्वाचे आहेत.

④ पशुपालन :-

मानवाला पशुपालनाचे महत्त्व कळल्यावर तो निरनिराळे जनावरे पाळू लागला. त्यातूनच पशुपालनाचा विकास झाला. जेथे विस्तीर्ण गवताळ आहे तेथे पशुपालनाचा व्यवसाय चालतो. पशुपालन व्यवसायात मांस, लोकर, कातडी व दूध इ. पदार्थ मिळविण्यासाठी

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:08

पशुपालन व्यवसाय केला जातो.

(५) शेती.

अवजारांची माहिती मिळाल्यावर मानव शेती करू लागला. अनुकूल भूरचना, सुपिक जमीन व पुरेसे पर्जन्य असलेल्या प्रदेशात शेती केली जाते. शेतीचे प्रकार आदिवासी कापिवार शेती, जलसिंचनाची शेती, व्यापारावरची शेती, अल्की शेती इ. प्रमुख शेतीचे प्रकार आहेत. व्यावसायिक मिश्र शेती म्हणजे बागायती शेती.

(६) निरनिराळे व्यवसाय :

मानवाने आपले जीवन जगण्यासाठी निरनिराळे व्यवसाय करावे लागतात. त्यांनाच आर्थिक क्रिया असे म्हणतात. यात उदा. मासेमारी, पशुपालन, शेती. उद्योगधंदे, कारखाने इ. यांचा आर्थिक भूगोलात अभ्यास केला जातो.

(७) खाणी:

खनिजसंपत्तीचे दोन प्रकार आहेत. त्यात

(१) धातुजे - लोहखनिज, मँगनीज, तांबे, कोळसा, अभ्रक इ.

(२) अधातुजे - दगडीकोळसा, खनिजतेल इ. उपयोगी खनिजांचे उत्खनन होते. औद्योगिकीकरणानंतर खाणकाम व्यवसायाची खूप प्रगती झाली.

अशा वरील प्रकारे आपणास आर्थिक भूगोलाच्या व्याप्ती स्वरूप याची साकार पणे तर नक्की केले आहे.

प्र. आर्थिक भूगोलाच्या अर्थशास्त्राशी आणि इतर सामाजिकशास्त्राशी असलेला संबंध स्पष्ट करा ?


→ प्रस्तावना :- (Introduction)

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची प्रमुख उपशाखा आहे. आर्थिक भूगोल मानवाच्या आर्थिक व्यवसायाचा अभ्यास केला जातो. मानवाचे आर्थिक व्यवसाय प्राकृतिक आणि सांस्कृतिक पर्यावरणावर अवलंबून असतात. पर्यावरणाच्या भिन्नतेमुळे मानवाच्या आर्थिक विकासात भिन्नता आढळते.

मानव सर्वप्रथम आपल्या सभोवतालच्या पर्यावरणातून अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करत असतो परंतु भूपृष्ठावरील साधनसंपत्तीच्या असमान वितरणामुळे तो राहतो त्या प्रदेशातून त्याच्या सर्वच गरजा भागविल्या जातात असे नाही. म्हणून इतर काही प्रदेशातून वस्तूंची देवाण घेवाण करावी लागते. म्हणून आर्थिक भूगोलात साधनसंपत्तीचे उत्पादन, वितरण व उपभोग यांचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात येतो. आर्थिक भूगोलाचा शास्त्रशुद्ध अभ्यास १९ व्या शतकात सुरुवात झाली. या शास्त्राला भू-अर्थशास्त्र (Geoeconomics) हे नाव सर्व प्रथम चीशोल्म या शास्त्रज्ञाने दिले. या शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात देखील त्याने केली म्हणून त्याला भू-अर्थशास्त्राचे जनक असे म्हणतात.

- इतर शास्त्राशी असलेला संबंध.

आर्थिक भूगोल ही भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा मानली जाते. इतर शास्त्रातील विचारवंतांनी या शास्त्राला यथाशक्ती मदतच केली आहे. भूगर्भशास्त्र, हवामानशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, गणितशास्त्र, राजनीतिशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र इ. वेगवेगळी शास्त्रे यामुळेच आर्थिक भूगोलाशी संबंधित आहेत. म्हणून आर्थिक भूगोल व सामाजिकशास्त्राचा जवळचा संबंध आहे. आर्थिक भूगोल व इतर शास्त्राशी असणाऱ्या संबंधातून आर्थिक भूगोलाची व्याप्ती व महत्त्व लक्षात येते. आर्थिक भूगोलाचा इतर शास्त्राशी असलेला संबंध खालील प्रमाणे आहे.



(1) आर्थिक भूगोल व अर्थशास्त्र :-> [Economic Geography and Economics]
आर्थिक भूगोल व अर्थशास्त्र यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. अर्थशास्त्र लोकांच्या मागणीचा व त्यांच्या गरजेचा अभ्यास केला जातो. लोकांच्या अन्नधान्याच्या गरजा, अन्नधान्याची मागणी, बचत, गुंतवणूक, रोजगार, उत्पादकता यांची लोकसंख्यात्मक बाजू, आधुनिक आर्थिक विकास यांचा अभ्यास केला जातो. तर आर्थिक भूगोलात मानवाच्या आर्थिक क्रिया व त्यावर परिणाम करणारे घटक, मानवाचे आर्थिक उद्योग, शेती, उद्योग धंदे, नैसर्गिक वनस्पती, खनिजसंपत्ती, व्यापार, वाहतूक इ. सर्व घटकांचा अभ्यास आर्थिक भूगोलात केला जातो. तसेच आर्थिक भूगोलात वस्तू उत्पादन करण्याचा अभ्यास केला जातो. तर अर्थशास्त्रात त्याचा विनिमय करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे ही दोन्ही शास्त्रे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. आर्थिक भूगोल व अर्थशास्त्र समाविष्ट केल्याने ते संबंधीत आहे असे मानले जाते.

(2) आर्थिक भूगोल व भूगर्भशास्त्र :- [Economic Geography and Geology]
भूरूप भूगर्भशास्त्रात पृथ्वीच्या कवचाचे तसेच अंतर्गत भागाचे विश्लेषण केलेले असते. अंतर्गत भागातील खनिजसंपत्तीची माहिती त्यात समाविष्ट आहे. यासबंधीचा संबंध आपणास आर्थिक भूगोलात स्पष्ट दिसतो. जमिनीचा उंच सखलपणाच्या, खनिज संपत्तीच्या, शेतीच्या व वाहतूकीच्या दृष्टीने हा संबंध आर्थिक भूगोलाशी घनिष्ठ बनला आहे.

(3) आर्थिक भूगोल व वनस्पतिशास्त्र :- [Economic Geography and Botany]
विविध प्रकारची वनस्पती, तिची उत्पादकता, परिस्थिती, आर्थिक महत्व, वर्गीकरण इ. माहिती वनस्पतीशास्त्रातून समाविष्ट आहे. आर्थिक भूगोलातील नैसर्गिक संपत्तीत वनस्पतीचा समावेश होतो त्यात वनस्पतीचे प्रकार, उत्पादनक्षेत्रे, परिस्थिती व आर्थिक महत्वाचा अभ्यास सिद्ध होत असल्याने आर्थिक भूगोल व वनस्पतीशास्त्र यांचा संबंध प्राचीन मानला जातो.

(4) आर्थिक भूगोल व गणितशास्त्र :- [Economic Geography and Mathematics]
आर्थिक भूगोल व गणितशास्त्र यांचा अतिशय घनिष्ठ संबंध असला आहे. पृथ्वीचा आकार, आकार तिचे परिभ्रमण व परिभ्रमण गती, अक्षांश-रेखांश, स्थानिक व प्रमाणवेळ, आर्थिक उत्पादनातील बदल, सांख्यिकीय इ. माहिती बाबींमुळे गणितशास्त्र व आर्थिक भूगोल यांचा संबंध जवळचा मानला जातो.

(5) आर्थिक भूगोल व प्राणिशास्त्र :- [Economic Geography and Zoology]
निरनिराळ्या प्रकारचे प्राणी त्यांची निवासस्थाने
यांचा अभ्यास प्राणिशास्त्रात केला जातो.

Shot on Y11
Vivo AI camera
2022.09.28 22:08

आर्थिक भूगोलात पुराव्याचा उपयोग मानवाच्या गरजांसाठी, लोकसंख्या इत्यादिकांसाठी
रचनासाठी व मोसमशास्त्राशी आर्थिक भूगोलात केला गेल्यामुळे प्राणिशास्त्र
व आर्थिक भूगोल संबंधित मानले जातात.

(६) आर्थिक भूगोल व राज्यशास्त्र : (Economic Geography and Political Science)
राज्यशास्त्रात जगाच्या विविध राजकीय
विभागाच्या, आर्थिक प्रगतीच्या सीमारेषांच्या, लोकांच्या राजकीय विचारसरणीच्या
अभ्यास समाविष्ट आहे. वरील राज्यशास्त्रातील सर्व घटक आर्थिक
भूगोलात उत्पादनावर योग्य परिणाम करणारे आहेत. देशाच्या विकासाशी
त्याचा संबंध असल्याने राज्यशास्त्र आणि आर्थिक भूगोल निगडित आहेत.

(७) आर्थिक भूगोल व पदार्थविज्ञान : (Economic Geography and Physics)
पृथ्वीची परिवलन व परिभ्रमण गती, त्यातील बदल,
गुरुत्वाकर्षण शक्ती, इलेक्ट्रॉनिक्स इ. अभ्यास भूगोल व पदार्थविज्ञानात
समाविष्ट आहे. यावरील बाबींचा परिणाम मानवाच्या कार्यक्षमतेवर
होतो. मानव हा उत्पादनाचा मुख्य घटक असून तो स्वतः एक नैसर्गिक संपत्तीचे
अंग आहे. ते आर्थिक भूगोलाशी संबंधित आहे.

(८) आर्थिक भूगोल व सैन्यशास्त्र : (Economic Geography and Military Science)
सैन्यशास्त्राचा मुख्य हेतू राष्ट्रीय संरक्षणाचा कार्यक्षम
असतो. यात सैनिक संख्या, त्यांची शस्त्रास्त्रे, दारूगोळा, अन्नधान्य पुरवठा
इ. बाबींना प्राधान्य देण्यात येते. आर्थिक प्रगतीच्या परमोच्च अवस्थेवर
पोहोचलेल्या राष्ट्राने जर सैन्याकडे दुर्लक्ष केले तर ती आर्थिक प्रगती
कुचकामी ठरते. त्या राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राचे दास्यत्व पत्करावे लागते. म्हणजेच
आर्थिक विकासातील सैन्यशास्त्र हा महत्त्वाचा घटक आहे. या घटकांचा
संबंध उत्पादनाशी आणि विकासाशी येत असल्याने आर्थिक भूगोल व सैन्यशास्त्र
निगडित आहे.

(९) आर्थिक भूगोल व हवामानशास्त्र : (Economic Geography and Climatology)
आर्थिक भूगोल व हवामानशास्त्र यांचा अतिशय जवळचा
संबंध आहे. कारण हवामानशास्त्रात हवा, पाऊस, तापमान, वारे, यांच्या कार्यक्षमतेची
माहिती हवामानशास्त्रात अभ्यासली जाते. हवामानाच्या मानवी जीवनावर होणारे
मानसिक, आर्थिक परिणामांना आर्थिक भूगोलात प्राधान्य असल्याने
हवामानशास्त्र व आर्थिक भूगोल निगडित आहेत.

(१०) आर्थिक भूगोल व रसायनशास्त्र : (Economic Geography and Chemistry)
रसायनशास्त्रातील रासायनिक खते आर्थिक भूगोलातील
शेती आणि उद्योगधंद्यात समाविष्ट आहे. लोकसंख्या वाढत असल्याने
... रसायन समाविष्ट आहेत उद्योगधंद्यात ...
... रसायनशास्त्राचा आर्थिक भूगोलाचा ...
आहे.

Shot on Y11
Vivo AI camera 2022.09.28 22:09